# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० / कार्तिक १८, १९४२ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**९४**. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, २०१९ चे चतुर्थ (हिवाळी) सत्र शनिवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील प्रलंबित **५६** लक्षवेधी सूचनांपैकी **३७** लक्षवेधी सूचनांची निवेदने गुरुवार दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० रोजी पत्रक-भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत व गुरूवार दिनांक ३० जुलै, २०२० रोजी पत्रक भाग २ व्दारे १३ सूचनांची निवेदने वितरीत करण्यात आली. आता ६ प्रलंबित सूचनांच्या निवेदनापैकी **५** सूचनांची निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. प्रलंबित **१** निवेदनाबाबत मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडे अर्ध शासकीय पत्राव्दारे पाठपुरावा करण्यात येत असून सदर निवेदने प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या प्रती वितरीत करण्यात येतील.

**विधान भवन**,
**मुंबई,**
दिनांक : ९ नोव्हेंबर, २०२०.

**राजेन्द्र भागवत**
सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (Website)

श्री. नितिन कुमार देशमुख विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

" ता.बाळापुर जि.अकोला अकोट येथिल ४४ गावे अद्यापही पिण्याच्या गोड्या पाण्यापासून वचित राहिल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, नागरिकांना दैनंदिन मीळणारे पाणी हे खारे असून पिण्यायोग्य नसल्यामुळे या ४४ गावामधील नागरिक हे किडनी व लिव्हर संब:धित आजाराने ग्रस्त असणे, याबबत शासनाने नागरिकांच्या आरोग्याकरीता विशेष योजना राबवून या ४४ गावांतील नागरिकांना लवकरात लवकर गोडे पाणी पुरविण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

**********

## माननीय मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन

अकोला जिल्ह्यात एकूण ८५२ गावे असून जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ५४१७ चौ.कि.मी. इतके आहे. त्यापैकी १९३९ चौ.कि.मी इतके क्षेत्र खारपाण पट्ट्यात आहे. जिल्ह्यातील खारपान पट्ट्यांमध्ये अकोला, अकोट, बाळापुर, मुर्तीजापुर व तेल्हारा असे ०५ तालुके समाविष्ट आहेत. जिल्ह्यातील खारपान पट्टा क्षेत्रात एकूण ३४३ गावे समाविष्ट आहेत.

अकोला जिल्ह्यातील प्रामुख्याने खारपान पट्ट्यातील गावांना गोड्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी खांबोरा ६४ जावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना व अकोट ८४ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना व लंधापूर ५७ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना अशा तीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजनाव्दारे जिल्ह्यातील १९८ गावांना भुपृष्ट स्त्रोताव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. सदर गावांमध्ये खारपान पट्ट्यातील १६५ गावे समाविष्ट आहेत. तसेच बाळापूर तालुक्यातील कारंजा रमजानपूर १० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, लोहारा ०२ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना व वझेगाव प्रादेशिक गावे पाणी पुरवठा योजना या योजनाव्दारे भुपृष्टावरुन पाणी पुरवठा सुरु आहे. प्रादेशिक पाणी पुरवठा योजना व्यतिरीक्त जिल्ह्यातील उर्वरित गावाकरिता ग्रामपंचायतीच्या स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना लघु पाणीपुरवठा योजना/ लघु पाणी पुरवठा योजना इत्यादी द्वारे पाणी पुरवठा उपलब्ध होत आहे.

बाळापूर तालुक्यात एकूण ६६ ग्रामपंचायती असून त्यामध्ये ८७ गावे समाविष्ट आहेत. ८७ गावापैकी ११ गावांना प्रादेशिक पाणी पुरवठा योजनाव्दारे पाणी पुरवठा सुरु आहे. इतर ११ लहान संख्येंच्या गावांना हातपंपाव्दारे पाणी पुरवठ उपलब्ध होत आहे. तसेच ६८ गावांना कुपनलिका उद्भव घेऊन ग्रामपंचायतीच्या स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनाव्दारे पाणी पुरवठा सुरु आहे. अकोट तालुक्यात एकूण १५२ गावे समाविष्ट आहेत. त्यापैकी ८२ गावे खारपान पट्ट्यात समाविष्ट आहेत. अकोट ८४ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेव्दारे अकोट तालुक्यातील ६५ गावांना गोड्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. ६८ गावांना कुपनलिका उद्भव घेऊन स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनाव्दारे पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच १९ लहान लोकसंख्यच्या गावांना हातपंपाव्दारे पाणी पुरवठा सुरु आहे.

बाळापूर तालुक्यातील खारपान पट्ट्यातील ३९ व टंचाईग्रस्त १३ गावे अशी एकूण ५२ गावे व अकोला तालुक्यातील १६ गावे अशा एकूण ६८ गावांकरिता बाळापूर तालुक्यातील कवठा बॅरेज उद्भव घेऊन ६८ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजना जल जीवन मिशन अंतर्गत प्रस्तावित करावयाची आहे. त्यासाठी ग्रामपंचायती कडून प्रस्ताव प्राप्त झालेले असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रस्तावित गावांतील सद्याच्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोता मध्ये क्षाराचे प्रमाण जास्त असल्याने सदर गावांना प्रादेशिक पाणी पुरवठा योजना आवश्यक आहे.

************

लक्षवेधी सुचना क्र.३९

**श्री.ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना क्र.३९ खालीलप्रमाणे आहे :-**

" मध्यवर्ती विश्लेषण प्रयोगशाळा, दादर, (मुंबई) या प्रयोगशाळेत पाणी व अन्न नमुने तसेच भांडार नियंत्रण विभागाकडून आलेले रंग, धातू, साबण, डिटर्जेंट, ब्रश इत्यादिच्या चाचण्या करण्यात येणे, सदर प्रयोगशाळेत अन्न सुरक्षा व मानक कायदा २००६ अन्वये अन्न व औषध प्रशासन यांचे अन्न सुरक्षा अधिकारी तसेच मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, कोकण रेल्वे, यांचे अन्न सुरक्षा अधिकारी यांनी गोळा केलेल्या अन्न नमुन्यांचे विश्लेषण केले जाणे, त्याच प्रमाणे विषबाधेप्रकरणी पोलिसांनी पाठविलेल्या अन्न नमुन्यांचे व पोलीसांकडून धाड टाकून जप्त केलेल्या गुटख्यात सुगंधीत तंबाखूचे विश्लेषणही या प्रयोगशाळेत केले जाणे, तसेच शालेय पोषण आहारा अंतर्गत मध्यान्ह भोजन तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी याच्या अंतर्गत महिला बचतगट आणि खाजगी संस्था, अशासकीय संघटना यांच्याकडून आलेले खिचडीचे नमुने सदर प्रयोगशाळेत तपासले जात असणे, परंतू सन २०१२ पासून उक्त प्रयोगशाळेतून अन्न व इतर कोणतेही पदार्थ यांचे नमूने तपासणीसाठी येणे बंद होणे, त्याऐवजी खासगी लॅबच्या मार्फत अन्नाचे नमूने तपासले जाणे, परिणामी यामध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार होऊन अयोग्य नमुन्यांची सर्रास विक्री व पुरवठा होणे, त्यामुळे सर्वसामान्य नागरीक व शालेय विद्यार्थी यांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, तसेच शासनाच्या महसूल बुडून तो खासगी लॅब चलकांच्या घशात जाणे, या सर्व प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता वा याबाबत शासनाची भूमिका "

---

मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

मध्यवर्ती विश्लेषण प्रयोगशाळा, दादर, मुंबई ही प्रयोगशाळा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येते. या प्रयोगशाळेत कुठल्याही अन्नपदार्थ व पाणी नमून्यांची तपासणी सन २०१२ पासून बंद झालेली नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्यावतीने शालेय पोषण आहार योजनेतर्गतच्या आहारांचे नमूने कोणत्याही खाजगी प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी पाठविले जात नाहीत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रयोशाळांमध्ये या आहारांच्या नमून्याचे रासायनीक विश्लेषण केल्यानंतर सदर आहार

शासनाने विहीत केलेल्या मानकांमध्ये बसत नसल्यास संबंधित आहार वितरण करणाऱ्या पुरवठादारावर नियमानुसार कारवाई केली जाते. सदर प्रयोगशाळेत सन २०१२ पुर्वी आणि नंतरही अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी यांनी घेतलेले अन्न नमूने विश्लेषणासाठी पाठविले जात होते. परंतू दिनांक ०५.०८.२०११ पासून संपूर्ण देशात अन्न सुरक्षा व मानदे कायदा,२००६ व नियमन २०११ लागु झाल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिपत्याखाली ०३ प्रयोगशाळा राज्यात सुरु केलेल्या आहेत. या ०३ प्रयोगशाळांमध्ये तसेच राज्याच्या आरोग्य विभागातंर्गत असलेल्या सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांमध्ये सुद्धा अन्न नमूने विश्लेषणासाठी पाठविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे दिनांक ०३.०४.२०१७ पुर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेकडे सुद्धा अन्न नमूने विश्लेषणासाठी पाठविण्यात येत होते. तथापि महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक ०३.०४.२०१७ पासून तपासणी शुल्क आकारण्यास सुरुवात केल्यामुळे सदर प्रयोगशाळेत अन्न नमूने पाठविणे बंद केले आहे. अन्न व औषध प्रशासनामार्फत घेतलेले अन्न नमूने कोणत्याही खाजगी प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात येत नाहीत, त्यामुळे गैरव्यवहार होणे, अयोग्य नमून्यांची सर्रास विक्री व पुरवठा होणे, सर्वसामान्य नागरीक व शालेय विद्यार्थी यांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, तसेच शासनाच्या महसूल बुडून तो खासगी लॅब चलकांच्या घशात जाणे इत्यादींचा प्रश्न उद्भवत नाही.

*****

(४१)

महाराष्ट्र विधानसभा

सन २०१९ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री.सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईतील जीटी रुग्णालयात, 'क्लिनीकल ट्रायल' च्या दरम्यान खाजगी औषध कंपनीने वैद्यकीय निकषाचे योग्य प्रकारे पालन न केल्याने, स्किझोफ्रेनियाग्रस्त रुग्णाला जे. जे. रुग्णालयात दि.०६.१०.२०१९ रोजी, जीव गमवावा लागल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, मृत्यू पावलेला ३५ वर्षाचा रुग्ण १० वर्षापासून जीटी रुग्णालयात वैद्यकीय उपचारासाठी दाखल असणे, 'क्लिनीकल ट्रायल' दरम्यान सदरहू रुग्णास 'पॅलिपॅरिडोन पाल्मिटेट' हे इंजेक्शन दिल्यानंतर रुग्णाची तब्येत बिघडून त्यातच त्यांचा मृत्यू ओढवल्याची घटना घडणे, सार्वजनिक रुग्णालयात खाजगी औषध कंपन्यांनी या ट्रायल करताना, रुग्णांना विमा कवच, वैद्यकीय मोबदला देण्यासह या ट्रायलसाठी कुटुंबियाची परवानगी घेणे बंधनकारक असतानाही, गेले तीन वर्षापासून सदरहू खासगी औषध कंपन्यांचा जे.जे., जीटी रुग्णालयामध्ये बेलगाम कारभार अव्याहतपणे सुरु असणे, सार्वजनिक रुग्णालयातील डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी व रुग्णालयातील जागा वापरुन त्याचा कोणत्याही प्रकारचा परतावा रुग्णालय प्रशासनास देण्यात येत नसणे,रुग्ण व त्याच्या नातेवाईकांना ८ ते ९ हजार रुपये किंमतीचे असलेले इंजेक्शन ट्रायलसाठी मोफत देण्यात येत असल्याची कोणतीही माहिती देण्यात येत नसणे, यामुळे रुग्ण व त्याच्या कुटुंबियांची 'क्लिनीकल ट्रायल' च्या संदर्भात खाजगी कंपनी व रुग्णालय प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात फसवणूक होऊन रुग्णांच्या जीविताला निर्माण झालेला गंभीर धोका, सदर प्रकरणी जे.जे. रुग्णालय समुहातर्फे चौकशी समिती नेमण्यात येणे, मागील पाच वर्षात झालेल्या ट्रायलची त्या संदर्भात झालेले सामंजस्य करार, अटी शर्तीची पुर्तता तसेच एथिकल कमिटीची या प्रकरणातील भूमिका व संस्थेला नियमानुसार देण्यात आलेला परतावा या संपूर्ण प्रकरणांची चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी रुग्णांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला असल्याने, रुग्ण व त्यांच्या कुटुंबियामध्ये निर्माण झालेले भितीचे व चिंतेचे वातावरण, यावाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाय योजना व प्रतिक्रिया".

---

मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

सेंट्रल ड्रग स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन यांनी Paliperidone Palmitate १५६ mg/ml Injectable suspension च्या बायो इव्हॅल्युएशन स्टडी करिता मे. एमिनियल फार्मास्युटीकल्स प्रा. लि, गुजरात यांना क्लिनिकल ट्रायल्सच्या संदर्भात मान्यता दिली होती. सदर मान्यतेच्या अधिन राहून एथिकल कमिटीने क्लिनिकल ट्रायलसाठी मान्यता दिली. सदर ट्रायल दरम्यान वैद्यकीय निकषांचे काटेकोरपणे पालन करुन रुग्ण नामे संतोष रंगराव घोलप, वय वर्ष-३६ यांच्यावर दिनांक ०१

मार्च,२०१९ पासून प्रतिमहा एक याप्रमाणे इंजेक्शन सुरु करण्यात आले. सदर रुग्णास दिनांक ०९ सप्टेंबर,२०१९ रोजी इंजेक्शनचा आठवा डोस दिल्यानंतर त्यास दिनांक २४ सप्टेंबर,२०१९ रोजी प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणाने गो.ते.रुग्णालय मुंबई येथे आंतररुग्ण म्हणून दाखल करण्यात आले. तदनंतर सदर रुग्णास पुढील उपचाराकरिता दिनांक ३० सप्टेंबर,२०१९ रोजी सर ज.जी.समूह रुग्णालये येथे संदर्भित करण्यात आले, उक्त रुग्णाचा दिनांक ०६ ऑक्टोबर,२०१९ रोजी सकाळी ८.४० वाजता क्लिनिकल ट्रायल दरम्यान सर ज. जी. समूह रुग्णालये, मुंबई येथे मृत्यू झाल्याची बाब खरी आहे.

सदर क्लिनिकल ट्रायल सुरु करण्यापूर्वी रुग्णाचे संमतीपत्र व त्यास ट्रायल दरम्यान निर्माण होणारे धोके याबाबतची पूर्वकल्पना देण्यात आली होती व सदरची प्रत रुग्णास देखील देण्यात आली होती.सदर रुग्ण हा दिनांक १७ मार्च, २०१८ पासून जी.टी. रुग्णालय, मुंबई येथे उपचार घेत होता. त्यामुळे हा रुग्ण गेल्या १० वर्षापासून जी. टी.रुग्णालयात उपचार घेत होता हे खरे नाही. रुग्णाला विमाकवच, वैद्यकीय मोबदला देण्यासह या ट्रायलसाठी खाजगी औषध कंपन्यांचा या रुग्णालयामध्ये बेलगाम कारभार अव्याहतपणे सुरु असल्याची बाब खरी नाही. क्लिनिकल ट्रायल्स या इन्स्टिट्युशनल एथिक्स कमिटी व ड्रग कंट्रोल जनरल ऑफ इंडिया (डी.सी.जी. आय.) यांच्या नियमांचे तंतोतंत पालन करुन करण्यात येतात.सदर ट्रायल्स संपल्यानंतर रुग्णालयास त्याचा एकदा मोबदला दिला जातो. तसेच, रुग्णास व त्याच्या नातेवाईकांना इंजेक्शनची किमत व सदरची ट्रायल त्यास मोफत मिळणार असल्याची पूर्वकल्पना संस्थेमार्फत देण्यात येते. यासंदर्भात डी सी.जी.आय यानी दि.२८जानेवारी,२०२० रोजी पारित केलेल्या आदेशात नमूद केल्यानुसार सदर प्रकरणी New Drugs And Clinical Trials Rules,२०१९ मधील नियम क्र.४२ अन्वये केंद्रिय अनुज्ञाप्ती प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या स्वतंत्र तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार रु. ४७,००,९७६/- इतकी रक्कम रुग्णांच्या नातेवाईकांस आदेश पारित झालेच्या दिनांकापासून ३० दिवसात मोबदला म्हणून देण्याचे निर्देश दिले आहेत. सदरचा मोबदला हा संस्थेस प्रदान करण्यात आला नसून तो संबधित रुग्णाच्या नातेवाईकांस देण्याचे निर्देश आहेत. त्यामूळे रुग्णालय प्रशासनाकडून मोठया प्रमाणात रुग्णांची फसवणूक करुन त्यांच्या जीवितास धोका निर्माण करण्याची बाब संयुक्तिक नाही.

गोकुळदास तेजपाल रुग्णालयामध्ये क्लिनिकल ट्रायल दरम्यान मृत्यू पावलेल्या रुग्णाच्या संदर्भात अधिष्ठाता सर ज.जी.समूह रुग्णालये, मुंबई यांनी शासनास सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही सुरु आहे. सर ज.जी.समूह रुग्णालय, मुंबई येथील एथिकल कमिटीच्या मान्यतेनुसार दिनांक ०१ जानेवारी,२०१५ ते आतापर्यंत ६९ क्लिनिकल ट्रायल्स तदसंबंधित सामंजस्य करारानुसार करण्यात आल्या आहेत. रुग्णालय प्रशासनामार्फत कोणत्याही प्रकारची एथिकल ट्रायल घेण्यापूर्वी क्लिनिकल ट्रायल ॲग्रिमेंट (सी.टी.ए.) प्राप्त करण्यात येते. सदरचे सी.टी.ए. व डी.सी.जी.आय.यांच्या मान्यतेशिवाय कोणत्याही प्रकारच्या क्लिनिकल ट्रायल रुग्णालयामध्ये करण्यात येत नाही.

H/1779-1a-

***********************************************************************

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक -५८</u>**

**महाराष्ट्र विधानसभा सन २०१९ चे (हिवाळी) अधिवेशन**
**मा. श्री. योगेश सागर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.**

---

" राज्यातील अंबरनाथ (जि.ठाणे) येथील उप-जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलेल्या आठ ते दहा रुग्णांना अँटिबायोटिक औषधे देण्यात आले होते, त्यातील काही इंजेक्शने मुदतबाह्य झालेले असतांना देखील चुकीचे स्टिकर लावून त्याचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे १२ रुग्णांना रक्ताच्या उलट्या होऊन त्यापैकी तिघाची प्रकृति चिंताजनक झाली असल्याचे दिनांक ०३.१२.२०१९ दरम्यान निदर्शनास येणे, चिंताजनक असलेल्या तीन रुग्णांना मुंबईच्या रुग्णालयात हलविण्यात आले असून उर्वरित ८ ते ९ रुग्णांवर उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयात उपचार सुरु असल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकारामुळे रुग्णांच्या नातेवाईकामध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, अंबरनाथ येथील उपजिल्हा शासकीय रुग्णालयातील मुदत बाह्य औषधे दिलेल्या डॉक्टराविरोधात स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष. याबाबत शासनाने करावयाची आवश्यक ती उपाययोजना व शासनाच्या प्रतिक्रिया."

---

**<u>मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन</u>**

कै. बी. जी. छाया उपजिल्हा रुग्णालय, अंबरनाथ हे ६५ खाटांचे रुग्णालय असून ते सन २०१८ मध्ये नगरपरिषदेकडून सार्वजनिक आरोग्य विभागास हस्तांतरीत करण्यांत आलेले आहे.

कै. बी. जी. छाया उपजिल्हा रुग्णालय, अंबरनाथ येथे १२ महिलांना अशक्तपणा, डेंग्युताप, ताप, विषमज्वर, इ. आजारामुळे दाखल करण्यात आले होते. त्यापैकी ९ रुग्णांना तापाच्या उपचारासाठी सेट्रीयाझोन १ ग्रॅम हे इंजेक्शन रात्री ९ च्या सुमारास देण्यात आले होते. जंतू संसर्गामुळे येणा-या तापासाठी हे औषध वापरण्यात येते. त्यामुळे चुकीचे औषध दिले हे खरे नाही. इंजेक्शन दिल्यानंतर अर्ध्या तासाने या रुग्णांनी उलटया व मळमळ होत असल्याची तक्रार केली. रुग्णालयातील डॉक्टरांनी या रुग्णांवर उपचार केले. परंतू उलटया व मळमळ थांबत नसल्यामुळे इंजेक्शन दिलेल्या ९ रुग्णांना पुढील उपचारासाठी व इंजेक्शन न दिलेल्या ३ रुग्णांना हा त्रास होत नसतानाही विनंतीमुळे मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर येथे दाखल केले होते. तेथेही उपचारा दरम्यान ९ पैकी ६ रुग्णांच्या उलटयांची तीव्रता वाढल्याने क्रिटी केअर रुग्णालय, उल्हासनगर येथे स्थलांतरीत करण्यात आले. प्रकृती सुधारल्यामुळे मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर येथील रुग्णांना दिनांक ४.१२.२०१९ रोजी तर

क्रिटी केअर रुग्णालय, उल्हासनगर येथील दाखल ६ रुग्णांना दि. ०५.१२.२०१९ रोजी घरी सोडण्यात आले.

उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांनी दि. ०६.१२.२०१९ च्या आदेशान्वये सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरीता समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने दि. १६.१२.२०१९ रोजी सादर केलेल्या अहवालामध्ये आवश्यकतेनुसार इंजेक्शन सेट्रीयाझोन दिल्याने, निर्जंतूक सिरिंज वापरल्याचे तसेच औषधाची मुदत दि.०५.०२.२०२१ पर्यंत असल्याचे नमूद केले असून, सदरील इंजेक्शनमुळे यापुर्वी कोणत्याही रुग्णास त्रास झाला नसल्याचेही स्पष्ट केले आहे. रुग्णांच्या अहवालामध्ये हेच औषध या रुग्णांना दिल्याचे नमूद आहे. उपरोक्त घटनेनंतर इंजेक्शन सेट्रीयाझोनच्या Batch No. 19, Cl-104 चा वापर त्वरीत थांबविण्यात आला असून औषधाचा नमूना अन्न व औषधी प्रशासन विभागाकडे नमूना तपासणीसाठी देण्यात आलेला आहे. त्याबाबतचा अहवाल अप्राप्त आहे.

****************************

## महाराष्ट्र विधानसभा

**मा.श्री चंद्रकांत नवघरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६० पुढील प्रमाणे आहे :-**

"हिंगोली जिल्ह्यातील शासकीय स्त्री रुग्णालयात वसमत हे २०१४ पासून कार्यरत असणे या रुग्णालयात महिला व नवजात बालकांवरील उपचार केले जात असणे, रुग्णालयाने शासनाचे विविध प्रकल्प व योजना प्रभावीपणे राबवून विविध पारितोषिक पटकावलेले असणे परंतू या रुग्णालयात स्त्री रोग तज्ञ बाल रोग तज्ञ बधिकरण तज्ञ प्रयोगशाळा तंत्रज्ञ व वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांची एकुण ३० पदे रिक्त असणे त्यामुळे रुग्णालयाची दुरावस्था झाली असणे रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांवर व्यवस्थित उपचार न होणे रुग्णालयात सोनोग्राफी मशीन उपलब्ध असूनही रेडीओलॉजिस्ट हे पद मंजूर न करण्यात आल्यामुळे रुग्णांचे गैरसोय होत असणे त्यामुळे शासनाने सदर रुग्णालयातील पदभरती त्वरीत करणेबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## निवेदन

शासकीय स्त्री रुग्णालय, बसमत जिल्हा हिंगोली हे ६० खांटाचे रुग्णालय सन २०१४ पासून कार्यन्वित असून येथे चालु वर्षात १४०९२-बाहयरुग्ण, ३७३०- आंतररुग्ण, ११८५-प्रसुती, ३४१- एल.एस.सी.एस, १८०६४- प्रयोगशाळा चाचण्या करण्यात आल्या आहेत.

शासकीय स्त्री रुग्णालय, बसमत जिल्हा हिंगोली येथील गट अ ते गट ड यां संवर्गातील विशेषज्ञ व वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची ८२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४६ पदे भरलेली असून ३६ पदे रिक्त आहेत. नियमित सेवेतील विशेषज्ञांची बधीरीकरण तज्ञ-२, बालरोग तज्ञ-१ व स्त्रीरोग तज्ञ-१ अशी ४ पदे भरली असून ६ रिक्त पदे विचारात घेवून रूग्णसेवा अविरत पुरविण्याकरीता कंत्राटी तत्वावर, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आय.पी.एच.एस. कार्यक्रमांतर्गत स्त्रीरोगतज्ञ व भुलतज्ञ ही पदे उपलब्ध करून देण्यात आली आहे. एन.बी.एस.यु./ एन.एच.एम. अंतर्गत अधिपरिचारीका आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदे उपलब्ध करून देण्यात आलेली असून त्यांच्यामार्फत रुग्णांना आरोग्य सेवा देण्यात येतात. या रुग्णालयात सोनोग्राफी मशीन दि.१९.४.२०१९ रोजी कार्यान्वित करण्यांत आली असून, आतापर्यंत ११९२ सोनोग्राफी चाचण्या करण्यांत आलेल्या आहेत. तथापि, सदरहू रुग्णालयात रेडियोलॉजीस्ट हे पद मंजूर

नसल्याने सदरहू रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत सोनोग्रॉफी करण्यात येत आहे. पदोन्नती तसेच सरळ सेवेने रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासकीय स्त्री रुग्णालय, बसमत जिल्हा हिंगोली येथील उपलब्ध असलेल्या विशेषज्ञ व वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांना सेवा पुरविल्या जातात. तसेच आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना राबविल्या जातात. मागील ३ वर्षापासून रुग्णांना उत्कृष्ठ सेवा दिल्याबद्दल या रुग्णालयास कायाकल्प पुरस्कार, स्वच्छता हीच सेवा पुरस्कार, लक्ष प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

*********